# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394-7632
EISSN 2394-7640
Special Issue

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.9


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019


Volume-II, February 2019 (Special Issue)


ज्ञान-विज्ञान वि
University Grants Co


✤ EDITOR IN CHIEF ✤

DR. M. RAGHIB DESHMUKH

✤ GUEST EDITOR ✤

DR. BALASAHEB JADHAV



www.scholarsimpact.com


: Organised by :

**Department of Political Science**

M.S.P. Mandal's

**SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.**

UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third

(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

| | | |
|---|---|---|
| 41. | ब्रिटीश राजवटीतील स्त्रियांच्या मानवी हक्क संरक्षणाचे कायदे<br>प्रा. यादव परमेश्वर दत्ताराव | 143 –147 |
| 42. | लोकशाही समोरील आव्हाने<br>प्रा. डॉ. अंभुरे एस. डी. | 148 –150 |
| 43. | भारतीय लोकशाही आणि मानवी हक्क<br>प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे | 151 –154 |
| 44. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>बावचकर ऋतूजा पांडूरंग | 155 –158 |
| 45. | भारतीय लोकशाही आणि महिला सहभाग व संघटना<br>डॉ. सटाले एस.एन. | 159 –161 |
| 46. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>डॉ. एस.एन. आकुलवार | 162 –163 |
| 47. | भारतीय लोकशाही व दहशतवाद<br>डॉ. किरण चक्रे | 164 –169 |
| 48. | भारतीय लोकशाही व धर्माचे राजकारण<br>श्रीमती स्वाती बोकारे | 170 –171 |
| 49. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. तुकाराम एकनाथराव बोकारे | 172 –175 |
| 50. | महाराष्ट्र विधिमंडळ महिला सहभाग<br>प्रा. डॉ. आंधळे बी. व्ही. | 176 –179 |

(50)

# महाराष्ट्र विधिमंडळ महिला सहभाग

प्रा. डॉ. आंधळे बी. व्ही.
राज्यशास्त्र विभाग
कै. रमेश वरपुडकर महा. सोनपेठ

प्रस्तावना:—

महाराष्ट्र राज्य स्थापना 1 मे 1960 रोजी झाली आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम 168 नुसार प्रत्येक घटक राज्यसाठी राज्यपाल व एक किंवा दोन सभागृह असलेले विधानमंडळ असेल अशी तरतुद आहे. भारतातील महाराट्र कर्नाटक, उत्तरप्रदेश, बिहार व आंध्रप्रदेश या राज्यांसाठी द्विग्रही कायदेमंडळ आहे. जमू काश्मीरमध्ये द्विग्रही कायदेमंडळ आहे पण ते राज्याच्या घटनेनुसार आहे. घटक राज्यातील कनिष्ठ गृहाला विधानसभा व वरिष्ठ गृहाला विधान परिशद असे म्हणतात. विधानसभेची निवडनुक प्रत्यक्ष मतदान पध्दतीने होते तर विधान परिशदेची निवडणुक अप्रत्यक्ष पध्दतीने होते. महाराष्ट्र विधानसभेची सभासद संख्या 288 आहे तर विधानपरीशदेची सभासद संख्या 78 एवढी आहे

लोकशाही शासन पध्दतीमध्ये लोकांच्या राजकिय सहभागाला अधिक महत्व असते. लोक सहभागाशिवाय लोकशाही परिपक्व होत नाही. भारताने संसदीय शासन पध्दती स्वीकारून अप्रत्यक्ष लोक सहभागास महत्व दिले आहे. सन 1952 पासून भारतात सार्वत्रिक निवडणुकीच्या माध्यमातुन लोकसहभागाची प्रकिया घडवून आणली जाते. पुर्वी 21वर्श आणि आता 18 वर्शे वय पूर्ण करणारा प्रत्येक भारतीय नागरीक मतदानाच्या माध्यमातून आपला राजकिय सहभाग नोंदवु शकतो.

स्वतंत्र भारताच्या इतिहासात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडनुकांचा इतिहास अभ्यासला तर असे दिसून येते कि, पहिल्या दोन विधानसभा निवडनुका संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या झाल्या. 1962 ची निवडनुक स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने महत्वाची झाली.

महिलांची सामाजिक स्थिती:— महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणुन ओळखले जाते राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, आहिल्याबाई होळकर, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, लता मंगेशकर, मेघा पाठकर, प्रतीभाताई पाटिल, सिंधुताई सपकाळ, यांसारख्या विविध स्त्रीयांची महाराष्ट्राला ओळख आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत या सर्व स्त्रीयांचा मौलिक वाटा आहे. सन 2011 च्या भारतीय जनगणेनुसार भारतातील लोकसंख्येने दुसऱ्या कमांकाचे राज्य महाराष्ट्र आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या 11,23,72,972 एवढी आहे. यात पुरूश 5,83,61,397 व स्त्रीया 5,40,11,515 आहेत. 1000 पुरूशांमागे 946 स्त्रीयांचे प्रमाण आहे.

महाराष्ट्राच्या एकुण साक्षरतेचे प्रमाण 82.91: आहे यात पुरूश साक्षरता 84.82टक्के तर स्त्री साक्षरता प्रमाण 75.48: आहे. याचाच अर्थ पुरूशांच्या तुलनेत स्त्रीयांची लोकसंख्या जवळजवळ बरोबरच आहे. राज्याची अर्धी शक्ती स्त्रीयांच्या रूपाने महाराष्ट्रात कार्य करत आहे. परंतू पुरोगामी आसमाच्या महाराष्ट्रामध्ये स्त्रीयांचा सामाजिक विकास आजही 'मागास' असाच आहे. स्त्रीयांना आजही 'अबला नारी' म्हणून वागणूक दिली जाते त्यांच्यावर अन्याय, आत्याचार केले जातात. भारताच्या 2012 च्या आकडेवारीनुसार बलात्काराच्या गुन्हासाठी 2,28,650 प्राथमीक महिती अहवाल (FIR) नोंदविण्यात आले. याचा अर्थ हजारो महीलांमागे 0.39 बलात्कार होतात. परंतु हे प्रमाण नोंदणीकृत आहे. आज लैंगीक छळात अनेक प्रकार नोंदविले जात नाहीत. तसेच घरगुती हिंसाचाराचे हे प्रमाण 53 % एवढे आहे. यामुळे आजही स्त्रीयांचा सामाजीक दर्जा 'दुय्यम' असाच आहे.

बलात्कार, अपहरण, खुन, हुंडाबळी, लैंगिक छळवणुक, वेश्याव्यवसाय, यांसारख्या गंभीर गुन्हांना स्त्रीयाला सामोरे जावे लागत आहे. स्त्रीयांवरील या आत्याचाराच्या घटना लक्षात घेवून शासन विविध स्तरावर प्रयत्न करत आहे. परंतु या गुन्हयांचे प्रमाण कमी कमी हाण्याऐवजी वाढतच आहे. यावरून एक म्हणता येईल की, जोपर्यंत स्त्री जात

राज्यकर्ती होणार नाही तोपर्यंत तिचे शोशण थांबवणार नाही, स्त्रीयांचा राजकिय सहभाग वाढणे आवश्यक आहे. स्त्रीयांचा राजकिय सहभाग वाढला तर आपोआपच या सर्व समस्यांना आळा बसेल.

महिलांचा राजकिय सहभाग :–

भारताच्या व महाराष्ट्राच्या राजकिय प्रकियेचा आढावा घेतला तर महिलांचा राजकिय सहभाग अत्यल्प असा आहे. महिलांचा राजकिय प्रकियेत सहभाग वाढाल्या शिवाय देशाचा सर्वांगीन विकास होणार नाही. समाजाची अर्धी शक्ती विकासापासुन दुर राहीली तर भारत महासत्ता चर्चा केवळ अर्थहीन राहतील. म्हणुन येणाऱ्या काळात भारताच्या संसदेत व राज्याच्या विधानमंडळात महीलांना आधिक प्रतिनीधीत्व देवुन त्यांना राज्याच्या मुख्य प्रवाहात आणले पाहीजे. महीलांच्या राजकिय सहभागाचे विश्लेशन करताना आपणास पुढील विदारक आकडेवारी समोर येते.

लोकसभा निवडणुक मतदान टक्केवारी

| साल | एकुण मतदान टक्के | स्त्री मतदान टक्के | पुरूश म. टक्के. |
|---|---|---|---|
| 1952 | 68 | – | – |
| 1957 | 60.43 | – | – |
| 1962 | 60.43 | – | – |
| 1967 | 64.75 | – | – |
| 1971 | 59.94 | 48.52 | 51.48 |
| 1977 | 60.31 | 48.57 | 51.43 |
| 1980 | 56.8 | 48.77 | 51.23 |
| 1984 | 61.75 | 48.94 | 51.6 |
| 1989 | 59.68 | 48.02 | 51.98 |
| 1991 | 48.75 | 47.75 | 52.25 |
| 1996 | 52.45 | 48.11 | 51.89 |
| 1998 | 57.11 | 48.00 | 52.00 |
| 1999 | 60.96 | 47.86 | 52.14 |
| 2004 | 54.38 | 47.96 | 52.4 |
| 2009 | 50.71 | 47.69 | 52.31 |
| 2014 | 60.32 | 47.6 | 52.94 |

संदर्भ:– www.Elections in India.

वरिल तक्त्यातील मतदान टक्केवारी वरून एक दिसून येते की सरासरी 48.00% महीला मतदानात भा घेतात व 52.00% पुरूश मतदान करतात. केवळ 4% पुरूश मतदान अधिक करतात पण प्रतिनिधीत्वाच्या बाब ते महिलांपेक्षा 90 पट अधिक संख्येने सत्ता उपभोगतात. भारताच्या संसदेच्या इतिहासात 10 ते 12% महिल प्रतिनीधी निवडुन जातात. सध्या च्या लोकसभा निवडनुकीमध्ये 61एवढया महिला सांसद आहेत.

महाराष्ट्र विधानसभा मतदान टक्केवारी

| साल | एकुन म. टक्के | स्त्री म. टक्के | पुरूश म. टक्के |
|---|---|---|---|
| 1952 | – | – | – |
| 1957 | – | – | – |
| 1962 | 60.36 | – | – |
| 1967 | 64.84 | 47.8 | 52.2 |
| 1972 | 60.63 | 48.78 | 51.22 |
| 1978 | 67.59 | 48.91 | 51.02 |
| 1980 | 53.03 | 48.8 | 51.02 |
| 1985 | 59.17 | 48.76 | 51.24 |
| 1990 | 62.26 | 48.57 | 51.43 |
| 1995 | 71.69 | 47.96 | 52.04 |
| | | 48.18 | 51.82 |

| | | | |
|---|---|---|---|
| 1999 | 60.95 | 47.86 | 52.14 |
| 2004 | 63.44 | 47.89 | 52.11 |
| 2009 | 59.68 | 47.54 | 52.46 |
| 2014 | 63.38 | 47.18 | 52.82 |

| महाराष्ट्र विधानसभा महिला सहभाग | | | |
|---|---|---|---|
| विधानसभा | एकुन जागा | महिला आमदार | टक्केवारी |
| 1962–67 | 270 | 17 | 4.8 |
| 1967–72 | 270 | 11 | 04 |
| 1972–77 | 270 | 27 | 10 |
| 1978–80 | 288 | 08 | 2.77 |
| 1980–85 | 288 | 18 | 6.25 |
| 1985–90 | 288 | 16 | 5.55 |
| 1990–95 | 288 | 6 | 2.8 |
| 1995–99 | 288 | 13 | 4.51 |
| 1999–04 | 288 | 12 | 2.4 |
| 2004–09 | 288 | 12 | 2.4 |
| 2009–14 | 288 | 11 | 04 |
| 2014–19 | 288 | 16 | 5.55 |

संदर्भः– www.Elections in India.

महाराष्ट्र विधानसभा मतदान टक्केवारीचा आढावा घेतला तर असे दिसुन येते कि, सरासरी 48% महिला मतदान प्रकीयेत सहभागी होतात व 52%पुरूश मतदानात सहभाग घेतात. पण महाराष्ट्र विधानसभेत महिला प्रतिनीधीत्व सरासरी 2 ते 4% ऐवढे राहीले आहे. सध्याच्या महाराष्ट्र विधानसभेत एकुन 16 महिला निवडुन गेल्या आहेत यात भाजपा पक्षाच्या सर्वाधीक 10 महिला आमदार आहेत त्या खालोखाल कॉग्रेस पक्षाच्या 5 महिला आमदार आहेत व राकॉपा पक्षाची 01 महिला आमदार आहे. 2014 मध्ये 16 महिला निवडुन गेल्या. त्या निवडुण गेलेल्या महिला पुढील प्रमाणे होत.

महिला आमदार टेबलः–

वरिल निवडुन गेलेल्या महिलांमध्ये किती महिला सर्व सामान्य घरातुन निवडण्यात आल्या आहेत हा एक प्रश्नच आहे. यातील 60% महिलांना त्यांचा राजकिय वारसा लाभला आहे त्यामुळे त्या आज राजकारणात आहेत. असो असे असले तरी यातील काही महिला प्रतिनीधी उत्तम कार्य करत आहेत, यात महिला व बाल कल्याण मंत्री पंकजा मुंडे, विध्या ठाकुर, वर्शा गायकवाड, प्रमीती शिंदे यांची कामगिरी चांगली आहे.

| महाराष्ट्र विधानसभा निवडणुक 2011च्या विजयी आमदार | | |
|---|---|---|
| विजयी उमेव्दार | मतदारसंध | रा.पक्ष |
| 1. पंकजा गापीनाथ मुंडे | परळी वै. | भाजपा |
| 2. माधुरि मिसाळ. | पर्वती. पुणे | भाजपा |
| 3. मंदा म्हात्रे | नवी मुंबई | भाजपा |
| 4. विध्या ठाकुर | गोरेगावं मुंबई | भाजपा |
| 5. मेघा कुलकर्णी | कोथरूड | भाजपा |
| 6. भारती लव्हेकर | दासोवा | भाजपा |
| 7. मनीशा चोधरी | दहिसर | भाजपा |
| 8. स्नेहलता कोल्हे | कोपरगाव | भाजपा |
| 9. मेनिका राजळे | शेवगाव | भाजपा |
| 10. संगीता ठोंबरे | केज | भाजपा |
| 11. अमिता चव्हाण | भोकुर | कॉग्रेस |
| 12. वर्शा गायकवाड | धारावी | कॉग्रेस |

| | | |
|---|---|---|
| 13. यशोमती ठाकुर | तेओसा | कॉंग्रेस |
| 14. निर्मला गाविक | इगतपुरी | कॉंग्रेस |
| 15. प्रणिती शिंदे | सोलापुर | कॉंग्रेस |
| 16. ज्योती कालाणी | उल्हासनगर | राकॉपा |

महिलांच्या राजकिय सहभागाचा फायदा केवळ महिलांनाच होतो असे नाही तर सर्व समाजाला होतो. कारण महिलांकडे आजही पुरूशांच्या तुलनेत आधिक राजकिय नैतिकता अधिक आहे. का महीला राजकारणात आली आणि निवडनुक विजयी झाली तर ती पुन्हा विजयी होण्याची शक्यता अधिक असते. आज पंचायतराज सारख्या स्थानीक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. ही बाब राजकारणांच्या दृष्टीने सकारात्मक आहे. 2008 च्या एका सर्वेक्षणानुसार भारतात पंचायतराजमध्ये 13 लाख 67 हजार 594 महिला काम करतात तर महाराष्ट्रामध्ये 1 लाख 21 हजार 490 महिला पंचायतराजमध्ये प्रत्यक्ष सहभागी आहेत. तसेच अलिकडील भारतातील राज्यांच्या निवडणुकांध्ये महिला मतदानाचा टक्का वाढत आहे. गोवा, मणिपुर, पंजाब, उत्तराखंड व उत्तरप्रदेश या पाच राज्याच्या विधानसभा निवडणुकिमध्ये 2007 च्या निवडनुकीत 41.92% महिलांनी मतदानात भाग घेतला होता त्यानंतर 2012च्या निवडणुकीत हेच प्रमाण 60.28% इतके वाढले आता नुकत्याच झालेल्या 2018 च्या पाच राज्याच्या विधानसभा निवडणुकांध्ये महिला मतदानाचा टक्का वाढला आहे. राजस्थानमध्ये 2018 च्या विधानसभेत एकुन 74.2% मतदान झाले यात 74.7% महिलांनी तर 73.8% पुरूशांनी मतदानाचा हक्क बजावला छतिसगढ मध्ये सुध्दा पुरूशांपेक्षा महिला मतदानाची टक्केवारी अधिक आहे. याचाच अर्थ महिला आज राजकिय प्रकियेत सहभागी होण्यासाठी पुढे येत आहेत पण निर्णय प्रकियेत त्यांना सामाहुन घेतले जात नाही. तसेच त्यांच्या तुलनेत त्यांना प्रतिनीधीत्व देत नाहीत आजचे राजकिय पक्ष सुध्दा महिलांना उमेद्वारी देण्यात कंजुशी करतात येणाऱ्या काळात महिलांचा राजकिय सहभाग वाढवण्यासाठी समाजाच्या सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहेत. संसदेत 33% आरक्षण देण्यापेक्षा राजकिय पक्षांनी महिलांना उमेव्दारी दिली तर आपोआपच त्याचे प्रतिनीधीत्व वाढेल व त्यांचे राजकिय सहभाग वाढण्यास मदत होईल.

संदर्भः– www.Elections in India.
1. भारतीय शासन आणि राजकारण. – भा. ल. भोळे.
2. भारतीय शासन आणि राजकारण. – शांताराम भोगले.
3. समाज प्रभोधन पत्रीका. –
4. परिर्वतनाचा वाटसरू.
5. इंडीया टुडे.